महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)

सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

दूरध्वनी : (०२२) ६९९६५५५५, फॅक्स :(०२२) ६९९६५५९९ ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in

-: जाहिरात :-

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या मुख्यालयात कार्यालयीन कामकाजाकरिता **०९ नग** लॅपटॉप (Laptop) खरेदी करावयाचे आहेत. लॅपटॉपचा तपशील (Specification) आणि इतर अटी, शर्ती व अन्य माहितीकरीता महाराष्ट्र शासनाच्या maharashtra.gov.in त्याचप्रमाणे महामंडळाच्या mahasecurity.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर जाहिरात देण्यात आली असून त्यामधील अटी शर्ती नुसार पात्र पुरवठाधारक यांच्याकडून दरपत्रके जाहिरात नमूद केलेले ठिकाण व दिनांकापर्यंत मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक दरपत्रक / पुरवठाधारक यांनी उपरोक्त संकेतस्थळावरील सविस्तर जाहिरात पाहून दरपत्रके सादर करावीत.

Sd/-
पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

१. <u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ आहे. महामंडळाचे मुख्यालयात दैनंदिन कार्यालयीन कामकाजाकरिता एकूण **०९ नग लॅपटॉप (Laptop)** खरेदी करावयाचे असून, त्यासाठी स्पर्धात्मक दरपत्रके मागविण्याकरीता प्रस्तूत जाहिरात देण्यात येत आहे.

२. <u>लॅपटॉपचा तपशील (Specifications): -</u>

कंपनी :- HP

1. Intel – Ryzen 5
2. Gen – 13
3. Ram – 16 GB (DDR4)
4. SSD – 512 GB
5. Display Size – 14 Inch
6. Operating System – Windows 11 plus, Lifetime Genuine (Factory loaded)
7. Microsoft office – 2024 Pro

३. <u>दरपत्रक सादर करताना खालील सूचनांनुसार सादर करावेत. :-</u>

१. कंपनी / फर्मच्या नावे GST अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

२. ओळखीचा पुरावा म्हणून पॅनकार्ड / आधार कार्ड / पासपोर्ट / मतदार व ओळखपत्र इ. पैंकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकीत प्रत जोडावी.

३. दरपत्रकामध्ये लॅपटॉपची मूळ किंमत त्यावरील GST किंमत याबाबत स्वतंत्रपणे स्पष्ट नमूद करावे.

४. एका संस्थेने अथवा व्यक्तीने एकच दरपत्रक सादर करावे. त्याचप्रमाणे त्या व्यक्तिचे दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये. असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबंधाचा संघर्ष म्हणून समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील. उदा. जर दोन कंपन्या निविदा सादर करणार असतील तर, एक व्यक्ती जी " कंपनी एक्स " चा मालक / संचालक / भागीदार / बहुसंख्य भागधारक असेल तीच व्यक्ती / संस्था " कंपनी वाय " ची मालक / संचालक / भागीदार / बहुसंख्य भागधारक नसावी.

५. अंतिम दिनांकानंतर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

६. प्रस्तूत जाहिरातीत नमूद केलेला तपशील (Specification) याबाबत काही संभ्रम / शंका असल्यास दुरध्वनी क्र. (०२२) ६९९६५५५५ वर संपर्क करावा.

७. पूरवठादाराने दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात खालील नमूद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

४. दरपत्रक पाठविण्यासाठीचा पत्ता व दुरध्वनी क्र.:-

व्यवस्थापकीय संचालक तथा पोलीस महासंचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

दूरध्वनी : (०२२) ६९९६५५५५, फॅक्स : (०२२) ६९९६५५९९.

५. दरपत्रक सादर करण्याचा दिनांक व वेळ :-

दि. १७.१०.२०२६ ते दि. ०९.११.२०२६ रोजी पर्यंत वेळ १८.०० वाजेपर्यंत.

६. दरपत्रक उघडण्यासाठी दिनांक आणि ठिकाण :-

१. दरपत्रके उघडण्याचा दिनांक - दि. १६.११.२०२६ व वेळ १२.०० वाजता.

२. **ठिकाण :** व्यवस्थापकीय संचालक तथा पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी : (०२२) ६९९६५५५५, फॅक्स : (०२२) ६९९६५५९९

७. निवड प्रक्रिया :-

१. दरपत्रके उघडण्याच्या दिवशी दरपत्रकधारक यांनी स्वत: अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांनी जाहिरातीत नमूद पत्त्यावर नमुद वेळेत हजर रहाणे आवश्यक आहे अन्यथा त्यांचे दरपत्रक बाद करण्यात येईल.

२. निवड केलेल्या पुरवठादारास, निवड केल्याबाबत ई-मेल आय-डीद्वारे किंवा पत्राद्वारे कळविले जाईल.

३. निवडलेल्या पुरवठादारकास पत्र पाठविल्यापासून आठ दिवसांच्या आत लॅपटॉप पुरवठा करणे आवश्यक राहील.

४. लॅपटॉप पूरवठा केल्यानंतर त्यामधील हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर स्पेसीफिकेशन्स नुसार ब्रॅन्डेड असल्याबाबत तपासणी करण्यात येईल. अशा तपासणीत काही त्रुटी आढळून आल्यास, निवड रद्द करण्यात येईल. देयक अदा केले जाणार नाही.

५. प्रस्तूतची जाहिरात कोणतेही कारण न देता पुर्णपणे किंवा अंशत: रद्द करण्याचा / फेरबदल करण्याचा अधिकार महामंडळाकडे आहे.

Sd/-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.